**Portion - कविता - ८. कोणापासून काय घ्यावे ?**

**पाठ - १७. आमची सहल**

**व्याकरण - विशेषण, क्रियापद**

**उपयोजित लेखन - उतारा आकलन**

---

**DELHI PUBLIC SCHOOL, NERUL, NAVI MUMBAI**
**MARATHI PRACTICE ASSIGNMENT - II**
**SESSION 2025-2026**
**CLASS – V**
**Date of Assignment - (30-7-25)**
**Date of Submission - (25-7-25)**

---

**प्रश्न क्रमांक १. खालील उतारा वाचून त्याखालील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

पंडित जवाहरलाल नेहरू यांचा जन्म १४ नोव्हेंबर १८८९ साली अलाहाबाद मध्ये झाला. त्यांनी आपले सुरुवातीचे शिक्षण घरी खाजगी शिक्षकांकडून घेतले. वयाच्या पंधराव्या वर्षी ते इंग्लंडला गेले आणि हरो येथे दोन वर्षे राहिल्यानंतर त्यांनी केंब्रिज विद्यापीठात प्रवेश घेतला. या विद्यापीठातून त्यांनी नैसर्गिक विज्ञानात पदवी प्राप्त केली. पंडित जवाहरलाल नेहरू यांना लहान मुले खूप आवडत म्हणून त्यांचा जन्मदिवस बालदिन म्हणून साजरा करण्यात येतो. मुले त्यांना प्रेमाने चाचा नेहरू असे म्हणत. त्यांना फुले फार आवडत. चाचा नेहरूचे मुलांवर खूप प्रेम होते. 'मुले म्हणजे देवाघरची फुले' असे ते नेहमी म्हणत.

१. पंडित जवाहरलाल नेहरू यांचा जन्म कधी झाला **?**

अ] १४ नोव्हेंबर १८८९    ब] १४ नोव्हेंबर १८९८

क] १४ नोव्हेंबर १९८९    ड] १४ नोव्हेंबर १९९९

२. वयाच्या पंधराव्या वर्षी पंडित नेहरू कोठे गेले ?

अ] अमेरिका  ब] आफ्रिका  क] इंग्लंड  ड] कॅनडा

३. मुले म्हणजे ----------------- फुले .

अ] मोठ्या घरची  ब] छोट्या घरची  क] देवाघरची  ड] यांपैकी नाही

४. **'birthday'** या इंग्रजी शब्दासाठी उताऱ्यात आलेला मराठी शब्द लिहा.

अ] जन्मदिवस  ब] नैसर्गिक  क] चाचा  ड] मुले

५. या विद्यापीठातून त्यांनी --------------------------------------.

[ विधान पूर्ण करा. ]

**६. प्रश्नांची उत्तरे लिहा.**

अ. बालदिन म्हणून कोणाचा जन्मदिवस साजरा करण्यात येतो ?

आ. पंडित जवाहरलाल नेहरू यांना मुले प्रेमाने काय म्हणत ?

**प्रश्न क्रमांक २ अ. खालील वाक्यातील क्रियापद ओळखा.**

१. रेल्वे सुरू झाली.

२. आजीने पूजा केली.

**आ. खालील वाक्यातील विशेषण ओळखा.**

१. तारा तेजस्वी आहे.

२. चिंच आंबट आहे.

**इ. रिकाम्या जागा भरा.**

१. ---------------------------- एक शिकूया.

-------------------------- जीव जगूया.

२. ---------------------------- घेउ सावली.

-------------------------- पासुन जगणे.

**प्रश्न क्रमांक ३. खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

१. मुलांची सहल कोठे गेली होती ?

२. आमराईमध्ये मुले कोणते खेळ खेळली ?